
श्री महालक्ष्मी मंदिर, कडेठाण

# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १९९ वा ❑ बुधवार दि.२४ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## कोल्हापूर येथे महालक्ष्मी मंदिरात नवरात्री उत्सवासाठी भाविकांची गर्दी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**
**कोल्हापूर (मोहन चौकेकर)** – ११ दिवसांचा नवरात्रोत्सव करवीर निवासिनी अंबाबाई, श्री महालक्ष्मी मंदिरात घटस्थापनासह उत्साहात सुरू झाला. श्री पूजक माधव मुनिश्वर आणि मुख्य पुरोहित किरण लाटकर यांनी महालक्ष्मीच्या मूर्तीवर अभिषेक केला, त्यानंतर पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव शिवराज नाईकवाडी यांनी पूजा केली आणि नंतर दहा दिवसांच्या नवरात्रोत्सवा साठी घटस्थापना आणि अलंकृत (प्रतिमात्मक) पूजा केली.

आज श्री कमलदेवीची पूजा, त्यानंतर श्री बगलामुखी (२३ सप्टेंबर), श्री तारा देवी (२४ सप्टेंबर), श्री मांतंगी (२५ सप्टेंबर), श्री भुवनेश्वरी देवी (२६ सप्टेंबर), हत्तीवर पूजा (२७ सप्टेंबर), श्री षोडशी त्रिपुरासुंदरी देवी (२८ सप्टेंबर), श्री महाकाली (२९ सप्टेंबर), श्री* *महिषासुरमर्दिनी (३० सप्टेंबर), श्री भैरवी (१ ऑक्टोबर), आणि विजयदशमी दसऱ्याच्या दिवशी, श्री महालक्ष्मीची रथातून (२ ऑक्टोबर) मिरवणूक काढली जाईल. श्री महालक्ष्मी मंदिर दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध आहे, देशातील १८ महा शक्तीपीठांपैकी एक आहे आणि राज्यातील साडेतीन पीठां पैकी एक पूर्ण पीठ आहे.

चालुक्य काळात बांधलेले, हे मंदिर २७,००० चौरस फूट क्षेत्रात पसरलेले, पूर्णपणे काळ्या दगडाचे एक पुरातत्वीय आश्चर्य आहे. महालक्ष्मी मंदिराला ४५ फूट उंच मुख्य कळस आहे, ज्याची उंची सुपरस्ट्रक्चर पर्यंत ३५ फूट आहे आणि ते पूर्व-पश्चिम ३५० फूट आणि उत्तर-दक्षिण २२५ फूट पसरलेले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांच्या मते, राज्य आणि शेजारच्या कर्नाटक आणि आंध्र प्रदेशसारख्या राज्यांमधून सुमारे २५ लाख भाविक देवीचे दर्शन घेण्यासाठी येण्याची अपेक्षा आहे. बंदोबस्तासाठी एकूण ७०० पोलीस कर्मचारी आणि २००० हून अधिक होम गार्ड तैनात करण्यात आले आहेत. महाद्वार रोडवर १२२ सीसीटीव्ही कॅमेरे आणि मंदिराच्या परिसरात ८२ कॅमेरे लावण्यात आले आहेत. तर शहराच्या मुख्य ठिकाणी १५ मोठे स्क्रीन थेट दर्शन देण्यासाठी लावण्यात आले आहेत.

कोल्हापूर महानगरपालिकेने ताराबाई रोडवर ७५ गाड्या आणि २५० दुचाकींसाठी नवीन बांधलेले बहुमजली कार पार्किंग आणि दुचाकी पार्किंगचे उद्घाटन करण्यात आले . कोल्हापूर महानगर परिवहनने आज सकाळी जिल्ह्याच्या नऊ दुर्गांचे दर्शन देण्यासाठी आपली विशेष नवदुर्गा-दर्शन बस सेवा सुरू केली आहे.



## विशेष लेख...

### स्वप्न पाहण्यासाठी डोळ्यांची गरज नाही, फक्त दृष्टी हवी

**– प्रा डॉ सुधीर अग्रवाल**

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

एक म्हण आहे ज्याचा अर्थ असा आहे की जीवनात मोठे स्वप्न पाहण्यासाठी किंवा काहीतरी मोठे साध्य करण्यासाठी, केवळ शारीरिक दृष्टी किंवा डोळे असणे आवश्यक नाही, तर एक दृष्टी किंवा ध्येय असणे खूप महत्वाचे आहे. येथे दृष्टी म्हणजे ध्येये, महत्वाकांक्षा आणि भविष्यासाठी स्पष्ट दृष्टी, जी लोकांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यास प्रेरित करते. एखाद्या व्यक्तीला डोळे असो वा नसो, मनातील स्पष्ट ध्येय आणि ते साध्य करण्याची इच्छा हीच त्याला पुढे नेणारी असते.लोकांची स्वप्ने (ध्येये) त्यांना जीवनात काहीतरी साध्य करण्यासाठी प्रेरित करतात, मग त्यांना शारीरिक दृष्टी असो वा नसो.

अंध लोकही स्वप्न पाहू शकतात आणि ही स्वप्ने केवळ दृष्टीशी संबंधित नसून आंतरिक अनुभव आणि इच्छांशी संबंधित आहेत.

हे विधान एखाद्या व्यक्तीची आंतरिक शक्ती, दृढनिश्चय आणि भौतिक दृष्टीपेक्षा खूप महत्त्वाच्या गोष्टी पाहण्याची क्षमता यावर भर देते.

अनेक दृष्टिहीन उमेदवारांनी तंत्रज्ञानाच्या मदतीने आणि त्यांच्या कुटुंबियांच्या मदतीने यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आहे, ज्यात प्रांजल पाटील (पहिले दृष्टिहीन आयएएस अधिकारी) आणि रवी राज यांचा समावेश आहे. या उमेदवारांनी स्क्रीन रीडर्स, टॉकबॅक टूल्स, ऑडिओ पीडीएफ, ओसीआर सॉफ्टवेअर आणि यूट्यूब सारख्या संसाधनांचा वापर केला. त्यांच्या आईंनी त्यांना मोठ्याने वाचण्यास आणि नोट्स घेण्यास मदत केली आणि मैत्रिणींनीही पीडीएफ आणि नोट्स पाठवून त्यांना पाठिंबा दिला.

प्रांजल पाटील:भारतातील पहिल्या दृष्टिहीन महिला आयएएस अधिकारी, ज्यांनी त्यांच्या श्रवण क्षमतेचा फायदा घेतला आणि विशेष सॉफ्टवेअरच्या मदतीने कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय परीक्षा उत्तीर्ण झाल्या.

प्रांजल पाटील दृष्टिहीन असूनही, प्रांजल पाटीलने अनेकांना अशक्य वाटणारे काम साध्य केले. २६ वर्षीय या तरुणीने आयएएस परीक्षा ७७३ च्या अखिल भारतीय रँकसह उत्तीर्ण झाली आणि तिला हे पद मिळाले. तिला पहिली दृष्टिहीन आयएएस अधिकारी म्हणूनही ओळखले जाते. मुंबईतील या मुलीने केवळ सहा वर्षांची असताना शाळेतील एका घटनेत तिची दृष्टी गमावली. (प्रांजल पाटील दृष्टिहीन आयएएस पास झाली) एका वर्गमित्राने तिच्या डोळ्यावर मारला. दुखापतीनंतर, तिची एका डोळ्याची दृष्टी गेली आणि नंतर दुसऱ्या डोळ्याचीही. तथापि, या घटनेने तिला परावृत्त केले नाही आणि ती सतत शाळा आणि महाविद्यालयात टॉपर राहिली. पदवीधर होताना तिने आयएएस अधिकारी होण्याचा निर्धार केला. तिने एम.फिल देखील केली आहे. पाटीलने संगणक स्क्रीन वाचण्यासाठी सॉफ्टवेअर देखील वापरले.

रवी राज:

बिहारच्या नवादा जिल्ह्यातील माहुली या छोट्याशा गावातील रवी राजने असे काही साध्य केले आहे की सर्वांना अभिमान वाटेल. दृष्टिहीन असूनही, रवी राजने प्रतिष्ठित संघ लोकसेवा आयोग () परीक्षेत १८२ वा अखिल भारतीय क्रमांक मिळवून नवादा शहराचे नाव उंचावले आहे. दृष्टिहीन असूनही, रवीने सारखी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. रवीने जगासमोर एक उदाहरण ठेवले आहे की जीवनात कितीही आव्हाने आली तरी तुम्ही प्रत्येक ध्येय साध्य करू शकता

शिवम कुमार:

दिल्लीच्या रोहिणी भागात राहणारे शिवम कुमार श्रीवास्तव यांच्या आयुष्यातील बराचसा भाग एखाद्या चित्रपटाच्या कथेपेक्षा कमी नाही. १५ वर्षांच्या संघर्षानंतर त्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग () मध्ये नोकरी मिळाली. हा संघर्ष फक्त नोकरी मिळवण्यासाठी नव्हता तर व्यवस्थेत एक वेगळे स्थान निर्माण करण्यासाठी होता. शिवम २००८ मध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला. त्याला चांगला रँक मिळाला होता, पण त्याचे नाव अंतिम यादीत नव्हते. कोणतेही कारण देण्यात आले नाही, नकार पत्र देण्यात आले नाही. फक्त शांतता, संपूर्ण दुर्लक्ष.

शिवमने हार मानली नाही. तो सर्वोच्च न्यायालयात लढला. जुलै २०२४ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला त्याला नोकरी देण्याचा आदेश दिला. तोपर्यंत त्याचे सहकारी १५ वर्षे वाढले होते. काही जण तर संयुक्त सचिवही झाले होते. पण ४६ वर्षीय शिवम नुकताच नोकरीत रुजू झाला होता. ‘‘सात महिन्यांपूर्वी हा आदेश आला होता, पण मी अजून आनंद साजरा केलेला नाही. मी माझ्या नातेवाईकांनाही सांगितलेले नाही,‘‘ शिवम रोहिणी येथील त्याच्या तिसऱ्या मजल्यावरील घरातून म्हणाला. शिवम आता भारतीय माहिती सेवेत आहे.

मनू गर्ग:जयपूर येथील रहिवासी मनू गर्गने तंत्रज्ञानाचा वापर करून परीक्षा उत्तीर्ण झाली आणि सांगितले की प्रयत्न करणे त्याच्या नियंत्रणात आहे.

आयुषी डबास:

आयुषीने तिच्या पाचव्या प्रयत्नात ४८ वा क्रमांक मिळवला, हे दाखवून दिले की अपंगत्वाला शक्तीमध्ये बदलता येते.

या सर्व विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाच्या व आईवडिलांच्या मदतीने व आपल्या ध्येय शक्तीच्या बळावर अंधत्वावर मात करत विजय प्राप्त केला.

## वैविध्यपूर्ण अभियानाचा गौरव

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

यावर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार दक्षिण भारतातील लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेते मोहनलाल यांना जाहीर करण्यात आला आहे. अलिकडेच, भारत सरकारने २०२३च्या दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी नामांकन जाहीर केली होते. त्यानंतर मोहनलाल यांच्या नावाची सरकारतर्फे घोषणा करण्यात आली. दादासाहेब फाळके पुरस्कार निवड समितीच्या शिफारशीनुसार ही घोषणा करण्यात आली. हा पुरस्कार भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो. अभिनेते मोहनलाल यांना आज म्हणजे २३ सप्टेंबर २०२५ रोजी ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये हा पुरस्कार प्रदान केला जाईल. दक्षिण भारताने भारतीय मनोरंजन विश्वाला अनेक महान कलाकार दिले त्यातीलच एक म्हणजे मोहनलाल. २१ मे १९६० रोजी केरळातील एलनथूर येथे येथे जन्मलेले मोहनलाल यांचे पूर्ण मोहनलाल विश्वनाथ नायर असे आहे. शालेय वयापासूनच अभिनयाची आवड असलेल्या मोहनलाल यांनी १९७८ साली थिरनोत्तम या मल्याळम चित्रपटातून चित्रपटसृष्टीत प्रवेश केला मात्र हा चित्रपट प्रदर्शित होऊ शकला नाही त्यामुळे १९८० साली प्रदर्शित झालेला मंजिल विरिंजा पुक्कल हा त्यांचा पहिला प्रदर्शित चित्रपट ठरला. विशेष म्हणजे या चित्रपटात त्यांनी नायकाची नाही तर खलनायकाची भूमिका केली मात्र ही भूमिका त्यांनी अशाप्रकारे वठवली की नायकापेक्षा त्यांनी साकारलेला



खलनायकच भाव खाऊन गेला. हा चित्रपट त्यांच्यामुळेच हिट झाला. याच भूमिकेने त्यांना चित्रपटसृष्टीचे कवाडे उघडून दिले. या चित्रपटाद्वारे मल्याळम चित्रपट सृष्टीला नवा ताकदीचा अभिनेता मिळाला. हा चित्रपट त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. त्यांच्या घरासमोर निर्माते दिग्दर्शकाच्या रांगा लागल्या. त्यांचे चित्रपट एकापाठोपाठ हिट होऊ लागले. यशस्वी चित्रपटांची मालिकाच त्यांनी सुरू केली. दर पंधरा दिवसांनी त्यांचा एक चित्रपट प्रदर्शित होऊ लागला. विशेष म्हणजे सलग चित्रपट प्रदर्शित होऊनही प्रेक्षकांनी त्यांच्या चित्रपटाकडे पाठ फिरवली नाही कारण प्रत्येक चित्रपटात त्यांनी वेगवेगळी भूमिका साकारली. अभिनयातील वैविध्यामुळे ते आपली लोकप्रियता टिकवून ठेवू शकले. राजविंटे माकन या चित्रपटात त्यांनी साकारलेली डॉनची भूमिका त्यांचा कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. या चित्रपटानंतर त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली. पुलीमुर्गम हा त्यांनी अभिनय केलेला चित्रपट तर सुपरहिट ठरला. हा चित्रपट त्याकाळात सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला . या चित्रपटाने त्या काळात १३० कोटी रुपयांची कमाई केली. दृश्यम या चित्रपटातील त्यांची भूमिका देखील लक्षवेधक ठरली. हा चित्रपट नंतर हिंदीतही आला ज्यात मोहनलाल यांची भूमिका अजय देवगण यांनी केली. अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयाच्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी तर त्यांना नऊ वेळा नामांकन मिळाले त्यापैकी ४ वेळा त्यांना हा पुरस्कार मिळाला. वानप्रस्थम या चित्रपटात त्यांनी कथकली नृत्य सादर करणाऱ्या कलाकाराची भूमिका साकारली. या चित्रपटातील त्यांच्या अभिनयासाठी त्यांना पहिल्यांदा सर्वोत्कृष्ट अभिनयाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांनी जवळपास ३०० पेक्षा अधिक मल्याळम चित्रपटात भूमिका केल्या. केवळ मल्याळम नाही तर हिंदीसह अन्य दक्षिण भाषीय चित्रपटातही त्यांनी भूमिका केल्या. दक्षिणेतील इतर अभिनेत्यांप्रमाणे त्यांचेही हजारो फॅन्कलब आहेत. परदेशातही त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. जवळपास चाळीस वर्षांहून अधिक काळ अभिनय क्षेत्रात घालवलेल्या मोहनलाल यांना भारत सरकारने पद्मश्री सारखा मानाचा पुरस्कार देऊनही गौरविले आहे. आता दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवून सरकारने त्यांच्या वैविध्यपूर्ण अभिनय कारकिर्दीचा योग्य गौरव केला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनेते मोहनलाल यांचे मनापासून अभिनंदन!

## नवरात्रीनिमित्त महिला सक्षमीकरण उत्सव

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – नवरात्रोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून महिला सक्षमीकरण अभियान ‘उत्सव नवरात्रीचा, उत्सव स्त्री शक्तीचा’ राबविण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात हा कार्यक्रम आज सुरु झाला. या अंतर्गत महिला सुरक्षितता,आरोग्य महिलांचे, प्रशासन, आर्थिक सक्षमीकरण, वक्तृत्व स्पर्धा, महिला बालविकास विभागाच्या योजना, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या योजना आणि सांस्कृतिक पर्व असे विविध कार्यक्रमआगामी आठ दिवसात आयोजीत करण्यात आले आहेत. आज या कार्यक्रमाचा प्रारंभ जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. पोलीस आयुक्तालयातील सायबर सेलचे सहायक पोलीस निरीक्षक कदीर देशमुख, जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक आश्विनी लाटकर, उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे, संगिता राठोड, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दराडे आदी उपस्थित होते.

जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने आपल्या भाषणात, स्त्री राज्याचा इतिहास सांगत, घटस्थापना व नवरात्रोत्सवामागील परंपरेचा इतिहास सांगितला. कदीर देशमुख यांनी सायबर सुरक्षा याविषयी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी स्वामी यांनी महिलांनी या उत्सव काळात आयोजीत या कार्यक्रमांचा लाभ घेऊन विविध विषयांवरील माहिती प्राप्त करुन घ्यावी,असे आवाहन केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. मीरा ढास यांनी केले.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-५२



नक्षत्र कुलातील अकरावे नक्षत्र "पूर्वाफाल्गुनी" आहे. या नक्षत्राचा "आराध्य वृक्ष" "पळस "आहे. "आसे तु हिमालयः" अर्थात हिमालया पासून कन्या-कुमारी पर्यंत 'पळस' हा सुंदर वृक्ष पहायला मिळतो. सिंह राशीच्या जातकाचा जन्म जसा 'मघा नक्षत्रात झालेला असतो तव्दतच 'पूर्वाफाल्गुनी' नक्षत्रातही झालेला असतो.

सूर्य महाराज, या राशीचे स्वामी आहेत. भारतीय संस्कृतीत पळसाला धार्मिक महत्व आहे. 'पळस' हा ब्रह्मदेवाचा वृक्ष आहे. पूर्वाफाल्गुनी नक्षत्राचा पर्यायी वृक्ष 'कुंडल' व 'सुरंगी "आहे ज्यांची माहिती आपण अगोदर वाचलेली आहेच...

"रिंगणी" ही धैर्यौषधी या नक्षत्राची आहे. कंटकारी, भुई रिंगणी, काटे रिंगणी ही नांवे या 'रिंगणी' वृक्षाला आहेत. पळसा प्रमाणेच 'रिंगणी'ची झाडे भारतभर आहेत.

या नक्षत्राची देवता "भग" आहे. या नक्षत्राची चारही चरणे सिंह राशीत येतात. 'भग' या देवतेचा 'आपल्याला समजेल असा अर्थ "ऐश्वर्या-ची देवता असा आहे. भगवान ऐश्वर्यवान आहे. ही एक वैदिक देवता आहे. 'भग' या शब्दाचा अर्थ "देणारा" असा आहे. 'ऐश्वर्य' देणारी देवता, म्हणजे 'भग...!! ' 'भग' म्हणजे सूर्याचे उदयापूर्वीचे सौम्य स्वरूप असते. "ॐ भगवते नमः" हा या देवतेचा मंत्र आहे. या मंत्र पठणाने या जातकाला ऐश्वर्य प्राप्त होते. या नक्षत्राच्या चार चरणांच्या स्वामींची नावे अनुक्रमे सूर्य, बुध, शुक्र आणि मंगळ होय. "ॐ भगाय नमः" हा मंत्र देखील उपयोगात आणतात.

ही राशी उष्ण प्रकृतीची आहे. रंगचक्रातील उष्ण रंगांपैकी पिवळा, पिवळसर नारिंगी, नारिंगी, लालसर नारिंगी, गडद लाल हे रंग या जातकांसाठी अधिक प्रभावी असतात, या शिवाय सांधे दुखी, कंप, खोकला, सर्दी, डोळ्यांचे विकार इ. पासून होणाऱ्या त्रासाची अगोदरच यांनी काळजी घ्यावयास हवी.

या जातकांनी "वास्तुशास्त्र पेंटींग"ची योजना केली तर यांना बुद्धी, भ्रमंती, विश्वासूपणा, भ्रमण, प्रवास वा भटकंती तून लाभ, अशा विषयांसंबंधी व्यवसाय वा नोकरी मध्ये अपेक्षेपेक्षा लाभा होतील, असे अनेक निरिक्षणांती सांगता येईल-

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



# जात्यावरच्या ओव्या......

---

पहाटेच्या पारी घं
घंटा वाजते मंदिरी
जागले नारायण
तुझ्या माझ्या अंतरी ||२६९||

पहाटेच्या पारी
गाई गवारे जागले
नगराच्या दारी
देव येऊन थकले ||२७०||

---

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# सर जो तेरा चकराये...




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

जय आणि वीरू त्याला ऐकू जाईल अशा पद्धतीने जेल में सुरंग बन रही हैं असं बोलतात. हरिराम ते अगदी कान देऊन ऐकतो. तो ज्या माणसाची दाढी करत असतो, त्याची दाढी आणि अर्धवट कापलेली मिशी सोडून देऊन जेलरला (असरानी) ही बातमी सांगायला धावतो. मग पुढील प्रसंग फारच बहारदार आहे. अंग्रेजोंके जमानेके जेलर असलेल्या असरानीला ते चांगलीच अद्दल घडवतात. असरानीने पण त्याची भूमिका फारच बहारदार आणि जिवंत केली आहे.



राम नगरकर हे नाभिक समाजातील. ते प्रसिद्ध विनोदी नट होते. त्यांनी लिहिलेले रामनगरी हे पुस्तक अत्यंत रोचक आणि गमतीदार तसेच हृदयस्पर्शी प्रसंगांनी भरलेले आहे. ते एकदा तरी जरूर वाचावं असं आहे.या पुस्तकाला पु ल देशपांडे यांची प्रस्तावना आहे. या पुस्तकावरून रामनगरी या नावाचा हिंदी चित्रपटही निघाला होता. या पुस्तकात राम नगरकर म्हणतात, नाभिक म्हणजे ना- भीक आम्ही भीक मागणार नाही. काम करून, लोकांची हजामत करून पैसे मिळवू.

कोणी कितीही मोठा माणूस असो, तो न्हाव्यापुढे आपली मान तुकवतोच. वर सुरुवातीला उल्लेख केलेल्या सर जो तेरा चकराये या गाण्यात एक कडवे आहे

नौकर हो या मालिक
लीडर हो या पब्लिक
अपने आगे सभी झुके हैं
क्या राजा क्या सैनिक

त्यांच्यापुढे जो जाईल त्याला मान झुकवावीच लागते. पण तुमचे जड झालेले डोके तो मसाज करून हलके करून देतो. केस पांढरे झाले असतील तर कलप लावून देतो. दाढी, मिशा इ सगळे व्यवस्थित करून तुमचे रुपडेच पालटून टाकतो. हजामत करणे हा वाक्प्रचार मराठीत वेगळ्या अर्थाने देखील वापरला जातो. एखाद्याची चांगली खरडपट्टी काढणे या अर्थाने तो वापरतात. बऱ्याच वेळा हा आशय व्यक्त करण्यासाठी बिनपाण्याने हजामत केली असे म्हटले जाते. नाभिक समाजातील शिवा काशीद याने आपल्या प्राणांचे बलिदान देऊन शिवाजी महाराजांचे प्राण वाचवल्याचे आपल्याला माहिती आहे. तर संत सेना महाराज हे वारकरी संप्रदायातील थोर संत होऊन गेले. ते नेहमी विठ्ठल भक्तीत रममाण झालेले असत. त्यांचा एक अभंग प्रसिद्ध आहे.

आम्ही वारीक वारीक, करू हजामत बारीक
विवेक दर्पण आईना दावू, वैराग्य चिमटा हालवू
उदक शांती डोई घोळू, अहंकाराची शेंडी पिळू
भावार्थाच्या बगला झाडू, काम क्रोध नखे काढू
चौवर्णा देउनी हात, सेना राहिला निवांत.

नाभिकांच्या कर्माला संत सेना महाराजांनी किती उंचीवर नेऊन ठेवले आहे ! त्यांनी सांगितलेल्या या गोष्टी प्रत्येक साधकाने करायच्या ठरवल्या तर परमार्थाची वाटचाल सुकर होईल.



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# मुमुक्षुलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

समर्थ करतात. पूर्वी त्याच्या हातून पापे घडली आहेत. अनेक यमयातना आठवतात मनाला भय वाटते आता त्याला वाटते की ‘‘याच्या आधी आयुष्यात पुण्याचा कधी विचारचं केला नाही अनेक पापांचे डोंगर मात्र रचले. संसाराचा मोहपाशात गुरफटून गेलो.

आपण स्वतः चे दोष झांकले. व चांगल्या माणसांना त्यांच्याकडे नसलेले दोष चिकटवले,साधू संत ,सज्जन यांची विनाकारण निंदा केली. आपल्या अवगुणांचा त्याला पश्चाताप होतो. संतांना ओळखले नाही भगवंताचे पूजन कधी केले नाही घरी आलेल्या अतिथी अभ्यागताची कधी साधी विचारपूस केली नाही. जीवन जगत असताना घरीदारी,कामाच्या ठिकाणी, कुणाला संतुष्ट केले नाही. माझे पूर्वपाप म्हणून माझ्या हातून कोणतेही सत्कर्म घडले नाही. माझे मन सदा आडमार्गाने गेले. सत्कर्म करण्यासाठी काया,वाचा,मनाने कशाचीही झीज होऊ दिली नाही. परोपकार केला नाही. कामवासनेच्या मस्तीने चंचल स्वभाव आवरू शकलो नाही. भक्तिरूपी माऊलीला बुडवून टाकली,शांतिरूपी विश्रांती मोडून टाकली. भगवंता पर्यन्त पोहचवण्यासाठी ऊपयोगी पडणारीबुद्धि व वासना दोन्ही मी मूर्ख पणाने विकल व असमर्थ करून टाकली. अविचारा पगडा मनावर ऐवढा बसला होता की माझ्यापाशी विवेकऊरलाच नाही.लौकिक अर्थाने प्रपंचात पूरा बद्ध झालो. श्रद्धा, प्रेम माया ममत्व हे माझ्या मनात कधी ऊत्पन्न झालेच नाही. आतापर्यंत जे जे कर्म केले ते ते सर्व लौकिकात बरे दिसावे म्हणून केलेकर्माचा सगळा खटाटोप वरपांगी होता. तो एक प्रकारचा दंभाचार होता.

(क्रमशः)

# व्यावहारिक वासना तृप्त करण्यासाठी संत नसतात.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नोकरी पाहिजे असेल तर ती देणारा जिथे असतो तिथे आपण जातो; त्याप्रमाणे भगवंताची भेट घ्यायची असेल तर संत जिथे राहतात तिथे आपण जावे. परमेश्वराचे स्वरूप ओळखण्यासाठी संतांकडे जाणेच जरूर आहे. संतांचे अस्तित्व त्यांच्या देहात नसून त्यांच्या वचनात आहे. संतांजवळ निर्विषय चित्त असते. रात्री सर्वजण झोपल्यावर शिपाई जसे गस्त घालतात, तसे साधुसंत आमच्या गैरसावधतेत जागृत असतात. आपण झोपी गेलो असताना ते आपली वृत्ती तपासतात. एका बाईला मूल झाले. पण त्याला आकडी येऊ लागली. ते पाळण्यात उगीच निपचित पडून असायचे. ते मूल बरोबर वाढेना, चांगले हसेना, खेळेना. मुलाची ती अवस्था पाहून आईला बरे वाटत नसे. अगदी तसेच संतांना वाटते. शिष्य केला खरा, पण साधनात जर त्याची प्रगती होत नसेल तर संताला वाईट वाटते : शिष्याची प्रगती होत असेल तर संत स्वत:च्या प्रेमापोटीच शिष्याला सजवील आणि त्याचे कौतुक करील. संतांना फारसे कधी कोणी चांगले म्हणत नाही. त्यांनी एकाचे कल्याण केले तर त्या माणसाचे दहा नातेवाईक त्यांना नावे ठेवतात. संतांना ओळखण्याकरिता जे गुण सांगितले आहेत ते त्यांची परीक्षा करण्याकरिता सांगितले नसून, त्यांचा त्या दृष्टीने उपयोगही होत नाही. त्या गुणांचे आपण आचरण करावे म्हणून ते सांगितलेले आहेत.

संतांजवळ राहणाऱ्या लोकांना तीन तोटे आणि तीन फायदे असतात. त्यांपैकी तोटे असे की, एक, वेदान्त बोलायला तेवढा उत्तम येतो; दोन, संतांजवळ राहिल्याने उगीच मान मिळतो; आणि तीन, ‘ते, म्हणजे संत, सर्व पाहून घेतील’ या खोट्या भावनेने हा वाटेल तसे वागतो. आता फायदे पाहू. पहिला म्हणजे, तो जर खऱ्या भावनेने संतांजवळ राहील तर तेवढ्यानेच, काही साधन न करतासुद्धा, त्याचा परमार्थ साधेल; दुसरा, त्याला मान मिळेल, पण तो स्वत: मानाच्या अपेक्षेच्या पलीकडे राहील; आणि तिसरा, वेदान्त त्याला बोलायला आला नाही तरी त्याच्या आचरणात येईल. म्हणून संतांजवळ राहणाऱ्याने ते सांगतील तसे वागावे, मानाची अपेक्षा करू नये आणि फारसा वेदान्त बोलू नये. तोंडापर्यंत आले तरी दाबून टाकावे. संतांची आज्ञा प्रमाण मानणे हे प्रचीती येण्याचे साधन आहे. व्यावहारिक वासना तृप्त करण्यासाठी संत नसतात, हे ओळखून आपण त्यांची संगत करावी. तेल आणि वात असल्यावर दिवा लावायला जसा वेळ लागत नाही, त्याचप्रमाणे आपली भूमिका थोडी तयार असल्यावर सत्संगतीचा परिणाम व्हायला वेळ लागत नाही.

संतांना ओळखण्यासाठी अनुसंधानाशिवाय दुसरे साधन नाही.

॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

ज्योतिर्मय साहित्य

मनु च्या नंतर अनेक पिढ्या ह्या राजर्षी योगात प्रवीण असणाऱ्या राजांच्या झाल्या. म्हणून भारत वर्ष हे प्रचंड मोठे आणि संपन्न असे एक राष्ट्र म्हणून उदयास आले. परंतु हळूहळू योग निपुणता कमी व्हायला लागली. राजे लोक राजर्षी योगात प्रवीण उरले नाहीत. तसतशी या देशाची शकले पडावयास सुरुवात झाली. आणि भारत वर्ष छोटा छोटा होत चालला. हे हरवलेले योग वैभव पुन्हा प्रस्थापित करावे आणि पुन्हा भारताला सामर्थ्य प्रदान करता यावे म्हणून भगवान श्रीकृष्णांनी या योग प्रतिष्ठापण्या साठी पुन्हा अवतार धारण केला.

पूर्वी ऋषीमुनी ज्ञानयोग अवलंबित. ही साधना साठ साठ हजार वर्षे पर्यंत सतत करून त्यांना ही शक्ती मिळवावी लागे.

सत्य युगात वायु तत्व प्रधान शरीर होते अन्न पाण्याविना मनुष्य कित्येक वर्षे जगू शकत असे. त्यामुळे आयुष्यमान हे हजारो वर्षाचे होते. त्रेता युगात आयुष्यमान आणखी कमी झाले तर द्वापार युगात म्हणजे भगवान श्रीकृष्णांच्या काळात ते जेमतेम सव्वाशे दीडशे वर्षा पर्यंतच राहिले. द्वापार युगात देह जल तत्त्व प्रधान रूपात होते म्हणून इतके तरी वर्ष ते जगू शकले. कलियुगात पृथ्वीतत्व प्रधान शरीर असल्या कारणाने अन्न पाण्याविना आपण जगुच शकणार नाहीत. आणि आपले आयुष्य ६० ते ८० वर्ष इतकेच उरले आहे. भगवान श्रीकृष्णांनी कालानुरूप योग साधना ही इतकी हजारो वर्षाची करणे या काळात शक्य नाही हे जाणून आणि काल सुसंगत योगाच्या नियमात बदल करून बुद्धियोग नावाचा योग प्रस्थापित केला. बुद्धियोग म्हणजे काय हे आपण आता पाहूयात.

गीता शास्त्र आणि ज्ञानेश्वरी वस्तूत: एकच आहेत उलट ज्ञानेश्वरीत त्याचे विस्तारीकरण अधिक चांगल्या पद्धतीने केलेले आहे. आपणासअनेक शास्त्रीय ग्रंथ हे उपलब्ध आहेत, तरी या सर्व शास्त्रात गीता शास्त्र हे मोक्षदायी स्वतंत्र आहे. इतर शास्त्रे परतंत्र आहेत म्हणजे बोलाचीच कढी बोलाचाची भात, असे सांगणारे आहेत. ते विधी निषेधात्मक आहेत. सर्वच प्रकारची उधारी उसणवारी, कर्जबाजारी आहे. आणि या गीताशास्त्रात नकदही देना नकदही लेना. इथे स्विच दाबण्यापुरते बोलणे बाकी सर्व प्रत्यक्ष विज्ञान आणि प्रयोग आहेत. साचची बोलाचे हे नव्हे शास्त्र/ पैस संसार जिनते शस्त्र/ आत्मा अवतरविते मंत्र अक्षरे इये //१५/५७६ अतिंद्रीय अव्ययाचे ज्ञान विज्ञान साक्षात तात्काळ अनुभव आहेत ते अनुभवही सहजची योग घडे नाभ्यासिता असे आहेत. म्हणून हे शास्त्र अपूर्व व अवलौकिक व पूर्ण शास्त्र आहे. गीता शास्त्र हे प्रवृत्तीत राहून काय व कसे करा व ज्ञान विज्ञान आणि प्रयोगांचा उपयोग करावयास प्रवृत्त करते. प्रवृत्तीतून सहज निवृत्त होण्याची कुशलता शीकविते. शारीरिक रोग निवारण्यासाठी जसे शरीर शास्त्र, आरोग्य शास्त्र, सांगितले जात नाही तर प्रत्यक्ष योग्य चिकित्सा म्हणजेच औषधे खाऊन रोग नाहीसा करावा लागतो, तसे संसार रोग नाशा साठी शास्त्र सांगून अनंत जन्मात लव ही लाभ होत नाही. तर त्यासाठी रक्त मन बुद्धी अहंकार व प्राणांची कारण शरीरापर्यंत पंचकोश चिकित्सा करावी लागते. ही चिकित्सा(उपचार) सांगणारे जे शास्त्र आहे त्याला योगशास्त्र नाव आहे. भगवंताने गायलेल्या गीतेत उपनिषदातील व ब्रह्मविद्येमधील हे योगशास्त्र आहे. भगवत् योगशास्त्र आहे. हे सहज आहे. आपोआप अनायास होणारे आहे. मानवादी अष्टांग योगात करणे आहे, म्हणजे योग आसने ,प्राणायाम अशा क्रिया स्वतः होऊन कराव्या लागतात. पण महायोगात करणे नाही. त्याचा गंधही नाही. उपयोगही नाही. तर इथे होणाऱ्या क्रिया आपोआप होतात. हे सकलार्थ मती प्रकाशक आहे. म्हणून बुद्धी योगशास्त्र आहे. हे भक्ती प्रधान आहे. म्हणून हा भक्ती योग समस्त बुद्धी योग आहे. हा योग बुद्धीतील क्लेश नष्ट करून ऐश्वर्य उत्पन्न करून शाश्वत महानंद शांत आनंद देणारा आहे. या योगा सारखे सोपे जगी काय आहे? (कैसा विश्वाचीया कृपा/ करुनी महानंद सोपा /अर्जुन व्याजे रूपा आणिला देवे// १८/१६८७ . **(क्रमशः)**

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

देहि सिंहध्वजे स्थानं समीपं च ध्रुवं च मे।
क्रीडेयं सह सिंहेन पूर्णामिच्छां कुरूश्व मे।।७०।।

हे सिंहध्वजे, मला तुझ्या जवळ अढळ स्थान दे. सिंहासमवेत मी खेळावे, ही माझी इच्छा पूर्ण कर.

निर्दालयामि दोषान्स्तान् गुणान्नङ्गीकरोमि च।
इत्यर्थं काङ्क्ष्ये मातः कृपायै ते दयानिधे।।७१।।

हे दयानिधे, तुझ्या कृपेची इच्छा करतो जेणे करून मी दोष दूर करून गुणांचा अंगीकार करावा.

सर्वेश्वरी जगन्माता देवमाता कुलेश्वरी।
प्रसन्ना सर्वदा देवि पाहि सुतं भवानि माम्।।७२।।

सर्वेश्वरी, जगदंबा, देवमाता, कुलदेवता, प्रसन्ना सर्व काही देणाऱ्या हे भवानी देवी, माझे पुत्राचे रक्षण कर.

चरणकमले ध्यायन्नानतोऽस्म्यहमम्बिके।
स्वीकुरु भक्तरूपेण मां भक्तवत्सले शिवे।।७३।।

हे अंबिके, चरणकमलांचे ध्यान करून मी नमस्कार करतो. हे भक्तवत्सल शिवे, मला भक्त म्हणून स्वीकार कर.

दृष्ट्वा त्वां विहसन्तीं वै सर्वाशा: सफला मम।
ताम्बुलं च मुखे दृष्ट्वा धन्योऽहमद्य मातृके।।७४।।

तुला हसताना पाहून माझ्या सर्व आशा खरोखर सफल झाल्या. माते, मुखातील तांबुल पाहून मी आज धन्य झालो.




# रक्ताभिसरण संस्थेचे शुद्धीकरण गरजेचे आहे, कारण...

ज्योतिर्मय साहित्य

१) जेवणाच्या लगेच आधी, जेवतांना मध्ये-मध्ये आणि जेवणानंतर लगेच पाणी प्यायचे नाही. कारण त्यामुळे जठराग्नी विझते, पाचक रस पातळ होतात त्यामुळे खाल्लेले अन्न पचत नाही. त्यामुळे जेवणाच्या किमान आर्धा तास आधी आणि जेवणानंतर एका तासानेच पाणी प्यावे.

२) पुरेसे आणि शिस्तबद्ध पद्धतीने पाणी प्यावे - पुरेसे म्हणजे २० किलो वजनाला १ लिटर पाणी लागते म्हणजेच ६० किलो वजन असेल तर ३ लिटर पाणी आवश्यक आहे, अती नको वा कमीही नको. शिस्तबद्ध पद्धतीने म्हणजे पाणी नेहमी बसून प्यावं, उभं राहून पिऊ नये. पाणी नेहमी ग्लास तोंडाला लावून प्यावं, वरुन पिऊ नये. आणि महत्वाचं म्हणजे पाणी चावून खावे म्हणजे गटागट न पिता जास्तीत जास्त लाळ मिसळून सावकाश पिलं पाहिजे कारण लाळ अल्कलाईन (क्षारीय) असते, ती दर मिनिटाला साधारण ०.५ बनत असते, ती जास्तीत जास्त पाण्यासोबत पोटात जाणे गरजेचे असते. कारण त्यामुळे पोटातील ॲसिडीक वातावरण नॉर्मल (सामान्य) व्हायला मदत होते आणि पोटातील ॲसिडीक वातावरण जेवढं नॉर्मल (सामान्य) होईल तेवढं वात-पित्त-कफ संतुलित राहून आपण निरोगी राहतो.

पाणी पुरेसे आणि शिस्तबद्ध पिण्यात आलं तरच किडनी ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते.

३) जागरण टाळणे - रात्री १० च्या आत झोपलंच पाहिजे. कारण रात्री १० च्या आत झोपलं तरच आपण रात्री ११ ते ३ या वेळेत गाढ झोपेत असू आणि या वेळेत गाढ झोपेत असलो तरच यकृत () ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते, अन्यथा शरीरशुद्धी व्यवस्थित होत नाही.

४) सुर्यास्तानंतर शक्य तितके लवकर जेवावे - सुर्यास्तानंतर आपली जठराग्नी शांत व्हायला लागते. त्यामुळे सुर्यास्तानंतर शक्य तितक्या लवकर जेवावे. खरं तर सुर्यास्तानंतर काहीच खाल्लं नाही पाहिजे. पण आपल्या लोकांचा स्वयंपाक लवकर होत नसल्याने सुर्यास्तानंतर किमान शक्य तितक्या लवकर तरी जेवावे.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

५) रात्री जेवलं की लगेच झोपणं टाळावे - जेवलं की लगेच झोपलं तर खाल्लेले पचत नाही आणि न पचलेलं सडून विषारी द्रव्ये (टोक्सिन्स) तयार होतात. त्यामुळे रात्रीचं जेवण आणि झोपणं यामध्ये २-३ तासांचे अंतर अवश्य असावे.

६) ताण-तणाव (स्ट्रेस) टाळावा - ताण-तणावांमुळे शरीरात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात. त्यामुळे ताण-तणाव नियंत्रित राहण्यासाठी नियमितपणे व्यायाम व ध्यान (मेडिटेशन) करावे.

७) विरुद्ध आहार टाळावा - विरुद्ध आहार शक्यतो दूध-दही याबाबतीत घडतो. जेवतांना दूधाची खिर खाऊ नये किंवा जेवणानंतर लगेच दूध पिऊ नये. कारण दूधात मीठ टाकलं तर दूध नासते, मग जेवणात मीठ असतेच त्यामुळे जेवतांना किंवा जेवणानंतर लगेच दूध पिलं तर दूध नासण्याची प्रक्रिया पोटात चालू होते आणि त्यामुळे पोटात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात म्हणून याला विरुद्ध आहार म्हणतात.

तसेच दही रात्री खाणंही विरुद्ध आहार आहे कारण दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) आपल्या शरीरात दुपारीच बनत असतात त्यामुळे दही दुपारीच खावे. रात्री दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) बनत नसल्यामुळे रात्री दही पचत नाही उलट सडून विषारी द्रव्ये तयार होतात त्यामुळे याला विरुद्ध आहार मानलं जातं.

# ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

राम म्हणाले असे झालेच तर मी अयोध्येचे राज्य बिभीषणास देईल. पुन्हा एकदा सामोपचाराचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही. समुद्र तीरावर सर्व सेनेसह राम देऊन बसले ते समुद्रमार्ग दाखवील या विचारात होते

समुद्रांची ३ दिवस वाट पाहूनही त्याने वाट दिली नाही. शेवटी राजांनी धनुष्या वर बाण चढविला की लगेच घाबरून समुद्र ,सह कुटुंब प्रकट झाला.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

राम त्यास म्हणाले तुम्ही शस्त्र काढल्या शिवाय प्रकट झाला नाहीत.समुद्र म्हणे मी तुमचा पूर्वज आहे. तुम्ही माझे वंशज आहात. पण खरे सांगतो तुमची मला लाज वाटते, तुमचे तोंड पाहण्याची लाज वाटते.

ज्या कुळाचे दोन वीर जवळ असताना त्या कुळाची वधू पळवून नेली जाते !हे कोणत्या कुळाला शोभेल?. माझ्या कुळात तुम्ही जन्माला मला अपमान वाटतो.तुम्ही पृथ्वीचे पती आहात तुम्ही याचना करणे योग्य नव्हे.

राम म्हणे आम्ही चुकलो.मग समुद्राने तुम्ही नलाला सेतू बंधनाचे काम द्या असे सांगितले. वाल्मीक रामायणात दगड तरले असे लिहिले नाही.तिथे नल नील यांनी वृक्ष व दगड हे अजस्त्र यंत्र द्वारे आणले व पूल बांधला असे लिहीले आहे. इतर रामायणात रा व म असे दोन अक्षरे लिहून दगड टाकले की दगड चिटकत व तरंगत असे लिहीले आहे. सेतू बनवण्याचे काम सुरू झाले. ‘‘राम‘‘ असे लिहिले की तो दगड समुद्रावर तरंगल्या जात असे. त्यांना एकमेकांना चिटकवून सेतूचे काम वेगाने पुढे सरकत होते. (क्रमशः)

# संत साहित्यिक डॉ. यु.म. पठाण

**ज्योतिर्मय साहित्य**

किती सुंदर नातं असतं हे
म्हणूनच म्हणावंसं वाटतं..
हे ज्ञानाचे मंदीर सुंदर
इथे आम्ही नतमस्तक झालो ।
शिल्पकार हे गुरुजन इथले
त्यांच्या हातून आम्ही घडलो ।।
इथल्या भिंती जिवंत पवित्र
स्पर्शाने त्या पावन झालो ।
मंगलमय गुरुंची वाणी
स्त्रोतात त्या न्हाऊन निघालो ।।
मान-पान, प्रतिष्ठा, पैसा
सारे काही व्यर्थ असे ।
आयुष्यातील आजवरची
ज्ञानशिदोरी श्रेष्ठ असे ।।

डॉ यु म पठाण हे साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलचे माजी विद्यार्थी. माझा त्यांचा परिचय विविध कार्यक्रमांमध्ये झाला. साताऱ्याबद्दलच्या गप्पा त्यांना प्रिय आहेत. याचे कारण म्हणजे डॉ. यु.म. पठाण यांचे वडील सातारा येथे मामलेदार होते. त्यांची नोकरी मामलेदारची असल्यामुळे ते सतत फिरतीवर असत. त्यांच्या नोकरीमुळे त्यांचे महाराष्ट्राच्या विविध ठिकाणी सरकारी अधिकारी म्हणून पोस्टिंग होत असे. बदलीच्या ठिकाणी डॉ.यु.म. पठाण यांचे कुटुंबीय साहजिकच त्यांच्याबरोबर त्या त्या ठिकाणी जात असत. ज्यामुळे डॉ. यु.म. पठाण यांना बालपणीच लोकसामाजिक जीवनाचे अनेक अनुभव मिळाले. वडिलांनी त्यांना खूप प्रोत्साहन दिले. त्यांच्या कुटुंबाचे वातावरण शिक्षण व संस्कृतीप्रधान होते. वडिलांच्या विविध धर्मांवरील अभ्यासामुळे डॉ. पठाण यांच्यावर त्यांचा चांगला प्रभाव झाल.डॉ. यु.म. पठाण यांचा जन्म १ मार्च १९३० चा. साधारणपणे १९४० च्या दशकात त्यांच्या वडिलांची बदली सातारा येथे झाली होती. त्याकाळात २ वर्षे डॉ. यु.म. पठाण यांनी साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेतले. त्यांच्या आठवणी प्रमाणे सातवी, आठवी चे शिक्षण त्यांचे साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. माझ्याशी झालेल्या चर्चेत मी त्यांना पुण्यामध्ये साधारणपणे १५ वर्षापूर्वी विचारले कि, आपणाला न्यू इंग्लिश स्कूलला भेट द्यायची आहे का? माझेही शिक्षण न्यू इंग्लिश स्कूलमध्येच झालेय. त्यांना अत्यंत आनंद झाला आणि साताऱ्याच्या वाटेवर जाता-येता शाळेला भेट देण्याचे निश्चीत करण्यात आले. त्याकाळात माझे ज्येष्ठ मित्र अनंत इंग्लिश स्कूलचे गाजी मुख्याध्यापक हे न्यू इंग्लिश स्कूलचे शाळा समितीचे अध्यक्ष होते. डेक्कन एज्युकेशन संस्थेच्या संचालक मंडळावरही ते होते. अचानक डॉ. यु.म. पठाण यांचा सातारा दौऱ्याचा योग आला. अशोक वाळिंबे यांच्या पुढाकाराने न्यू इंग्लिश स्कूलला त्यांनी भेट दिल्याने १२-१३ वर्षापूर्वी विद्यार्थ्यांना डॉ.यु.म.पठाण यांचे मार्गदर्शन लाभले. १९४० च्या दशकातील असलेल्या २ वर्षातील त्यांच्या या दगडी शाळेच्या आठवणी विद्यार्थ्यांना सांगण्यात ते रंगून गेले होते. माणूस कितीही मोठा होऊदे त्या व्यक्तीचे शालेय जीवन त्याला प्रियच असते. विशेषतः डॉ.यु.म. पठाण यांनी न्यू इंग्लिश स्कूल (दगडी शाळा) ने त्यांच्यावर त्या दोन वर्षामध्ये केलेल्या संस्काराचा उल्लेख करीत शाळेचे आभार मानले.



१९९० साली पुणे येथे संपन्न झालेल्या ६०व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी होते हे निश्चीतच. साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूल मध्ये त्यांना उत्तम शिक्षण आणि सांस्कृतिक घडामोडींचा अनुभव मिळाला. त्यांनी एम. ए. बी. टी., पीएचडी (मराठी आणि हिंदी) आणि डी.लिट या शैक्षणिक पदव्या पुढील शिक्षण घेत असताना मिळविल्या.

१९९० साली ६३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे येथे पुणे मराठी ग्रंथालयाने आयोजित केले होते. या संमेलनाचे अध्यक्ष होते डॉ. यु.म. पठाण (युसुफखान महंमदखान पठाण). त्यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात संतपीठाच्या कल्पनेचा पुरस्कार केला होता. पुढील काही काळातच संतपीठाच्या स्थापनेची शिक्षणमंत्र्यांनी पैठणला घोषणा केली. डॉ. यु.म. पठाण यांचे संतसाहित्य आणि संशोधन या क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्वाचे आहे. ६३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात संत ज्ञानेश्वरविषयक परिसंवाद, शांताबाई शेळके यांची मुलाखत, ग्रंथव्यवहारविषयक परिसंवाद, साहित्यानं मला काय दिलं याविषयीची चर्चा असे कितीतरी चांगले उपक्रम संपन्न झाले. डॉ.यु.म. पठाण यांनी आपल्या एका लेखात म्हंटले आहे... ज्ञानेश्वरविषयक परिसंवाद अकराच्या सुमारास सुरू झाला व त्याचा मी समारोप करेपर्यंत अडीच-पावणेतीन झाले तरीही श्रोत्यांनी तुडुंब भरलेला मंडप जसाच्या तसा होता. एका अर्थाने अवधान दीजे या ज्ञानदेवोक्तीची प्रचीतीच त्यावेळी येत होती.

डॉ. यु.म. पठाण हे मराठवाड्यातील आणि महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक. ते संतसाहित्य अभ्यासक, लेखक, भाष्यकार आणि संशोधक आहेत. अनेक मराठी साहित्य संमेलनात तसेच शैक्षणिक परिषदेत त्यांनी योगदान दिले आहे. संतसाहित्य, भाषाविज्ञान आणि मराठी-फारसी अनुबंध या विषयांवर त्यांचे संशोधन प्रसिध्द आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे ते विभागप्रमुख होते, तसेच कुलगुरुही होते. भारतात आणि भारताबाहेर ते ख्यातनाम आहेत. लघुकथालेखक, ललित लेख, व्यक्तिचित्र हे वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले आहेत. २००१ साली दिल्लीच्या बिर्ला फाऊंडेशनने तुलनात्मक भारतीय भाषाध्ययना साठी त्यांना राष्ट्रीय गौरववृत्ती देऊन त्यांचा सन्मान केला होता. १९८२ साली ब्रिटिश काउन्सिलची फेलोशिप (लंडन विश्वविद्यालय) त्यांना मिळाली होती. विशेषत: २००२ साली देहू संस्थानचा जगद्गुरु पुरस्कार देऊन संतसाहित्यासाठी त्यांनी केलेले संशोधनात्मक कार्याचा गौरव करण्यात आला. २००३ साली



शिरीष चिटणीस
सातारा ७५८८८६५०५१

मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार देण्यात आला. २००७ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविले. २०११ साली महाराष्ट्र सरकारचा ज्ञानोबा-तुकाराम जीवनगौरव पुरस्कार त्यांना मिळाला. २०१३ साली दलुभाई जैन मराठी साहित्यभूषण पुरस्कार दिला गेला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. हा दर्जा मिळत असताना ज्ञानोबा-तुकाराम आणि इतर संतांचे मराठी भाषेसाठीचे योगदान पुरावे म्हणून महत्वाचे ठरले. डॉ. यु.म. पठाण यांनी विशेषतः संतसाहित्याचे केलेले संशोधन मराठी भाषेच्या समृध्दीसाठी आणि मराठी अभिजात भाषेच्या मान्यतेसाठीही संस्मरणीय ठरले आहे. एकूण ४० च्या आसपास त्यांचे ग्रंथ प्रकाशित आहेत त्यातील २० ग्रंथ संतसाहित्यावरचे आहेत. मराठी भाषेच्या वाङ:मयीन-सांस्कृतिक सोहळ्यात रममाण होणाऱ्या या व्यक्तिमत्वाच्या अध्यक्षतेखाली जेव्हा पुण्यामध्ये ६३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १९९० मध्ये संपन्न झाले,तेंव्हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पु.ल. देशपांडे, वामन चोरघडे, डॉ. सरोजिनी बाबर, प्रा.द.मा. मिरासदार, शांता शेळके, शंकर पाटील, केशव मेश्राम, शंकर वैद्य, प्रा. राम शेवाळकर, डॉ. सुधीर रसाळ, डॉ. निर्मलकुमार फडकुले, वि. भ. कुलकर्णी, डॉ.वि.रा. करंदीकर, गोमंतकचे संपादक नारायणराव आठवले सह इतर सर्वांनी त्यांना गौरविले. मराठी भाषेच्या समृध्दीसाठी आपले आयुष्य समर्पित करणारे डॉ.यु.म. पठाण ९५ व्या वर्षी आपल्या आयुष्यातील जुन्या समृद्ध आठवणी सांगण्यामध्ये व्यतीत करीत आहेत. त्यांचा साताऱ्याशी असलेला ऋणानुबंध आपणासाठी आनंदाचा ठेवा आहे.

# सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक पुरस्काराचे वितरण

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश देण्याचे काम शिक्षक करतात. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान हा राष्ट्रनिर्मितीचा सन्मान आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते न शिकवता, कौशल्याधारित शिक्षण, समस्यांचे निराकरण, टीमवर्क आणि मूल्याधारित शिक्षण, ज्ञानासोबत सद्गुणांची शिकवणूक देऊन स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये विश्वास निर्माण होईल अशी सशक्त पिढी घडवावी. पुरस्कार प्राप्त शिक्षक हे राज्याचे ब्रँड ॲम्बेसेडर आहेत, असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काढले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गौरव पुरस्कार वितरित करण्यात आले. एनसीपीएच्या टाटा थिएटरमध्ये झालेल्या या समारंभात राज्यातील १११ गुणवंत शिक्षकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, आमदार ज.मो.अभ्यंकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, मनीषा कायंदे, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांच्यासह पुरस्कारप्राप्त शिक्षक आणि त्यांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते.

शिक्षक केवळ पुस्तकातील धडा शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देतात. आत्मविश्वास, संस्कार आणि प्रामाणिकपणाची बीजे त्यांच्या मनात पेरतात. शिक्षकांचे कार्य महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पुरस्कार वितरणाच्यावेळी दिलेल्या व्हीडिओ संदेशात केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, कोविड काळात शिक्षकांनी दाखवलेले समर्पण कौतुकास्पद होते. मोबाईल, लॅपटॉप, ऑनलाईन क्लासेस, व्हॉट्सॲप ग्रुप्स अशा साधनांचा वापर करून शिक्षण अखंड सुरू ठेवणाऱ्या शिक्षकांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. राज्यात शिक्षण क्षेत्रात सकारात्मक आणि गुणात्मक बदल घडवण्याचा शासनाचा निर्धार असल्याचे स्पष्ट करताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. अलीकडेच राज्य शासन आणि केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड ॲसेसमेंट इंडिया यांच्यात सामंजस्य करार झाला असून, त्याद्वारे जागतिक दर्जाचे प्रशिक्षण कार्यक्रम, डिजिटल साक्षरता, हवामान शिक्षण, जीवन कौशल्ये व मूल्य शिक्षणाशी संबंधित अभ्यासक्रम राज्यातील शाळांमध्ये राबविले जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. ग्रामीण तसेच शहरी शाळांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अध्यापन पद्धतींचा लाभ विद्यार्थ्यांना मिळणार असून, शिक्षकांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण होणार आहे. राज्याची शिक्षण व्यवस्था अधिक गुणवत्तापूर्ण, समावेशक आणि जागतिक मानकांशी अनुरूप करण्यासाठी निर्णायक पावले उचलली जात आहेत. यात शिक्षकांचे योगदान मोलाचे ठरणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी नमूद केले.

उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी बदलत्या काळानुसार शिक्षणामध्ये अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करण्याची गरज यावेळी अधोरेखित केली. पूर्वी साक्षर-अनाक्षर यावर भर होता, नंतर संगणक साक्षरतेचा काळ आला. आता कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) युग आहे. यामुळे प्रत्येकाने एआय साक्षर होणे, डिजिटल शिक्षण पद्धती आत्मसात करणे आवश्यक आहे. पुरस्कारामुळे शिक्षकांची जबाबदारी वाढली असून शिक्षकांनी स्वत:ला अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळविलेल्या शिक्षकांचे कौतुक करुन अधिकाधिक संख्येने शिक्षकांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर लौकिक मिळवावा, यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

जिल्हा परिषद शाळा आता कात टाकत असल्याबद्दल त्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले. शासनाने मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण उपलब्ध करून दिल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे यांना ‘वि. वा. हडप स्मृती कादंबरी पुरस्कार’

**ज्योतिर्मय साहित्य**

**गुहागर** – कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कादंबरी प्रकारातील प्रतिष्ठित ‘वि. वा. हडप स्मृती पुरस्कार’ यंदा प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे यांच्या ‘चिंबोरे युद्ध’ या कादंबरीस देण्यात आला आहे.

साहित्यसेवेतील डॉ. लबडे यांचे योगदान महत्त्वपूर्ण असून त्यांनी आतापर्यंत १९ पुस्तके प्रकाशित केली आहेत. कविता, कादंबरी, संपादन, समीक्षा, अनुवाद, सहलेखन या सर्व क्षेत्रात त्यांचा ठळक ठसा आहे.

समीक्षक दीपक बोरगावे यांच्या मते, ‘‘‘चिंबोरे युद्ध’ ही कादंबरी ग्रामीण राजकारण, सामाजिक विषमता आणि मानवी संघर्ष यांचे वास्तववादी चित्रण करते, पात्रे जिवंत आणि कथानक तणावपूर्ण आहे.’’ तर सर्जेराव रणखांब म्हणतात, ‘‘लबडे यांची भाषा जिवंत अनुभवाची आहे; ही कादंबरी फक्त कथा नाही, तर काळाचे दस्तऐवजीकरण आहे.’’

याआधी त्यांच्या ‘पिपिलिका मुक्तिधाम’, ‘शेवटची लाओग्राफिया’, ‘काळमेकर लाइव्ह’ या कादंबऱ्यांना राज्यभरातील पुरस्कारांनी सन्मानित केले गेले आहे.

कविता संग्रह ‘महाद्वार’, ‘मुंबई.. बंबई.. बॉम्बे..’, ‘ब्लार्टेटिया’ आणि संपादित ग्रंथांमुळे ते साहित्यवर्गात चर्चेत राहिले आहेत.

कोकण मराठी साहित्य परिषदेचे पदाधिकारी श्री आबा पाटील म्हणाले, ‘‘लबडे यांचे लेखन कोकणच्या साहित्यिक परंपरेला नवा आयाम देणारे आहे.’’ या पुरस्कारामुळे डॉ. लबडे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.














या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।



# नवरात्री आणि नऊ रंगांच्या साडीचा काय संबंध आहे?

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

नवरात्रीचा प्रत्येक दिवस एका विशिष्ट देवीला समर्पित असतो आणि प्रत्येक दिवसाला देवीच्या विशेष गुणांशी संबंधित एक विशिष्ट रंग दिला जातो. हे रंग देवीच्या शक्तीचे आणि आशीर्वादाचे प्रतीक म्हणून परिधान केले जातात आणि देवीशी आध्यात्मिकरित्या जोडण्याचा एक मार्ग आहेत.

म्हणूनच, नवरात्रीत नऊ रंगांच्या साड्या नेसणे हा उत्सव परंपरेचा एक अविभाज्य भाग आहे, जो देवीच्या उर्जेचे प्रतीक आहे.

नवरात्रीच्या नऊ दिवसांत दुर्गेच्या नऊ वेगवेगळ्या रूपांची पूजा केली जाते आणि प्रत्येक दिवस एका विशिष्ट रंगाशी संबंधित असतो. हे रंग परिधान केल्याने देवीचे विशेष गुण आणि आशीर्वाद दिसून येतात, ज्यामुळे भक्तांना सकारात्मक ऊर्जा आणि आध्यात्मिक संबंधाची भावना मिळते.

नवरात्री हा नकारात्मकतेवर विजय मिळवण्याचा उत्सव आहे आणि हा विजय आणि सकारात्मकता वाढविण्यासाठी रंगांचा वापर केला जातो.

पांढरा रंग शुद्धता आणि शांती यांचे प्रतीक आहे.

लाल रंग उत्कटता, शक्ती आणि ऊर्जा यांचे प्रतिनिधित्व करते. रॉयल ब्लू रंग समृद्धी, शांती आणि ज्ञानाचे प्रतीक आहे. पिवळारंग आशावाद, आनंद आणि स्पष्टतेचा रंग आहे.

हिरवा रंग वाढ, प्रजनन आणि सुसंवादाशी संबंधित आहे. राखाडी रंग संतुलन, तटस्थता आणि शांतीचा रंग आहे. नारिंगी रंग ऊर्जा, उत्साह आणि आनंदाचे प्रतीक आहे. मोर हिरवा रंग विशिष्टता आणि करुणा यांचे प्रतीक आहे. गुलाबी रंग सार्वत्रिक प्रेम आणि नवीन सुरुवातीचे प्रतीक आहे.

आध्यात्मिक संबंध:

या नऊ रंगांच्या साड्या परिधान करून, लोकांना देवीच्या विविध रूपांशी खोल आध्यात्मिक संबंध जाणवतो. ही परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आली आहे आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण मानली जाते.

नवरात्रीच्या साड्यांमध्ये सामान्यतः पारंपारिक डिझाइन आणि रेशमी कापड असतात, ज्यामुळे सणांसाठी एक आदर्श पारंपारिक लूक तयार होतो.

धार्मिक मान्यतेनुसार, या दुर्गा देवीचे आवडते रंग आणि वस्तू अर्पण केल्याने देवीला प्रसन्नता येते आणि जीवनातील सर्व दुःख दूर होऊन आनंद मिळतो.

पहिला दिवस : देवी शैलपुत्री

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी देवी शैलपुत्रीची पूजा केली जाते. पूजा करताना, देवीला पिवळे कपडे, फुले आणि मिठाई अर्पण करावी. शास्त्रांमध्ये हे शुभ मानले जाते. या रंगाचे कपडे परिधान केल्याने दिवस उर्जेने भरतो, नवीन संधी मिळतात आणि आर्थिक लाभ देखील मिळतो.

दुसरा दिवस: देवी ब्रह्मचारिणी

नवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी ब्रह्मचारिणी देवीची पूजा केली जाते. हे रूप तपस्या आणि संयमाचे प्रतीक मानले जाते. या दिवशी हिरव्या वस्तू, पाने किंवा सौंदर्यप्रसाधने अर्पण केल्याने मनोबल वाढते आणि जीवनात शांती राहते.




**प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

तिसरा दिवस: देवी चंद्रघंटा

तिसऱ्या दिवशी देवी चंद्रघंटा देवीची पूजा करताना पिवळ्या आणि हिरव्या रंगाचे मिश्रण अत्यंत शुभ मानले जाते. हे रंग भक्ताला धैर्य आणि आत्मविश्वास देते आणि जीवनात संतुलन राखण्यास मदत करते.

चौथा दिवस: आई कुष्मांडा

चौथ्या दिवशी, आई कुष्मांडा केशरी रंगाने पूजा केली जाते. केशरी ऊर्जा आणि उत्साहाचे प्रतीक आहे. या दिवशी केशरी कपडे, फळे किंवा मिठाई अर्पण केल्याने अडथळे दूर होतात आणि प्रयत्नांमध्ये यश मिळते.

पाचवा दिवस: आई स्कंदमाता

पाचव्या दिवशी, आई स्कंदमातेच्या पूजेमध्ये पांढऱ्या रंगाचे विशेष महत्त्व आहे. पांढरे कपडे किंवा नैवेद्य अर्पण केल्याने घरात शांती, समृद्धी आणि शांती येते. हा रंग पवित्रता आणि मानसिक शांती राखतो.

सहावा दिवस: आई कात्यायनी

सहावा दिवशी, आई कात्यायनीची लाल रंगाने पूजा केली जाते. लाल रंग धैर्य, शक्ती आणि विजयाचे प्रतीक आहे. या दिवशी लाल फुले, कपडे किंवा फळे अर्पण केल्याने शत्रूंचे अडथळे दूर होतात आणि आत्मविश्वास वाढतो.

सातवा दिवस: आई कालरात्री

सातव्या दिवशी, आई कालरात्रीची पूजा केली जाते. निळ्या रंगाचे तिच्या पूजेत विशेष महत्त्व आहे. हा रंग नकारात्मक ऊर्जा दूर करतो आणि भक्ताला भयमुक्त जीवन देतो असे मानले जाते.

आठवा दिवस: माँ महागौरी

आठव्या दिवशी, गुलाबी रंगात माँ महागौरीची पूजा करणे शुभ मानले जाते. गुलाबी रंग प्रेम, करुणा आणि सकारात्मकतेचे प्रतीक आहे. या रंगाने पूजा केल्याने नातेसंबंधांमध्ये गोडवा येतो आणि एक आनंददायी कौटुंबिक वातावरण निर्माण होते.

नववा दिवस: माँ सिद्धिदात्री

नवरात्रीच्या शेवटच्या दिवशी, माँ सिद्धिदात्रीची पूजा जांभळ्या रंगाने केली जाते. हा रंग आध्यात्मिक प्रगती आणि ज्ञानाचे प्रतीक आहे. जांभळ्या रंगाचे कपडे किंवा साहित्य अर्पण केल्याने भक्ताला आशीर्वाद आणि यश मिळते.

थोडक्यात, नवरात्रीत अध्यात्म, भक्ती आणि उत्सवाची भावना व्यक्त करण्याचा नऊ रंगांच्या साड्या परिधान करणे हा एक सुंदर आणि पारंपारिक मार्ग आहे.



# तिसरी माळ

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

नमस्कार

अश्विन शुध्द त्रितिया

२४/९/२०२५ आज आपण देवीला तिसरी शब्दरूपी माळ अर्पण करणार आहोत.

पद्मालये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं च सर्वदे ।
सर्वभूतहितार्थाय वसुवृष्टि सदा कुरू ।
जगन्मातनमस्तुभ्यं नमस्तुभ्यं दयानिधे ।
दयावति नमस्तुभ्यं विश्वेश्वरी नमस्तु ते ।।

संपूर्ण विश्वाची काळजी घेणारी ही जगदानंददायिनि मातेची मंदिरे ही नेहमी गावाबाहेर असलेली दिसतात. आज लोकसंख्या वाढली असल्याने ती मंदिरे गावात समाविष्ट झाली आहेत हे मान्य, पण  देवीची मंदिरे गावाबाहेर असण्याची कारणे म्हणजे वाईट व्यक्तिंना व असुरी शक्तिंना गावकुसाबाहेर थोपवून त्यांना पळवून लावायचे असा तर अर्थ नसेल ना !! माझं गाव माझी माणसं यांना कोणत्याही परिस्थितीत कसलीही झळ बसु नये गावातील सर्व लोक सुरक्षीत रहावेत ही संकल्पना त्यामागे आहे.

जया, विजया, अपराजिता, वात्सल्याची परिपूर्ण देवता आपल्या मुलाबाळांचे रक्षण करण्यासाठी असुरांना ठार मारून मंगलक्षेमकल्याणी आहे.

महासरस्वती, महालक्ष्मी, महाकाली या तीनही देवींचे आपल्या जीवनात कसा संबंध आहे ते पाहूया.

१) महासरस्वती - आईचे बोट धरून चालायला सुरुवात केलेली आहे. शाळेत जातो. आपल्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला आहे. आपल्याला माता सुचीत करते की शिक्षण हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे. शिक्षण हा राष्ट्राचा पाया आहे. शिक्षण घेऊन सुसंस्कृत बना. हा संदेश त्यामागे आहे. शिका सदाचार संपन्न नागरिक बना. स्वतःची व समाजाची प्रगती करा. असुरीवृती मनामध्ये येऊ देऊ नका. सर्वांनी एकोप्याने प्रेमाने रहा. ही मातेची शिकवण जर आपण अंतर्मुख होऊन विचार केला तर अशी पूजा आपण या नवरात्राच्या तिसऱ्या माळेला केली तर ती अधिक लाभदायक ठरेल.

२) महालक्ष्मी - शिक्षण घेतले आहे आता तुम्ही स्वतःला सिद्ध करा. सचोटीने सन्मार्गाने पैसे कमवा. कुणाचेही पैसे लुबाडणाऱ्या लोकांना सांगणे आहे की सचोटीने सन्मार्गाने कमावलेले वित्तधन मातेला मान्य आहे. लबाडीने द्रव्य संपादन करून केलेली पूजा माता कधीच स्विकारणार नाही.

व्यवहारी जगात वावरताना कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नका. दुष्ट भावना मनात आणू नका.

चांगल्या मनाने केलेली पूजा व साधा पण सात्विक प्रसाद मातेला हवा आहे.

लक्ष्मीभूषयते कुलम् लक्ष्मीभूषयते विद्यां सर्वाल्लक्ष्मीर्विशिष्यते ।।

३)महाकाली - महाकाली रूपाचा विचार केला तर ती उग्र स्वरूप धारण करून तिने दैत्यांला पायाखाली चिरडलेलं आहे.

**सौ.ऊज्वला धर्माधिकारी**
**पुणे**

महालक्ष्मी - करूनी वंदन
सद्भावना धरूनी
लक्ष्मी चरण पावन रे
कमल आसन कमल वंदन
कोमल ते मन लक्ष्मीचे ।।

सद्गुणांची कास धरली प्रामाणिक प्रयत्न करून योग्य कर्म केले तर लक्ष्मी नक्कीच प्रसन्न होते. ती सतत जवळ असावी अन्न, वस्त्र, निवारा या तीन मुलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात अतिलोभ कोणत्याही गोष्टीचा नसावा. तर महालक्ष्मीचा वरदहस्त कायम रहातो. हे तत्व ध्यानी धरून ईश्वरी सगुणोपासनेतुन कर्म करत राहिल्यास जीवनाची इतिकर्तव्यता होते. महालक्ष्मी ही सद्‌चित्तानंदप्रणवरूपिणी आहे. ती सकलचराचरात व्याप्त आहे.

धरती, आकाश, पाताळ, सामुद्रवसनी आहे.

ती आपल्याला भयमुक्त करते. तिचे वास्तव्य हे कमळात असते. अशा या जगत्जननी माता महालक्ष्मी मी तुला हृदयस्थ प्रणिपात करते माझ्या सेवेचा स्विकार कर. मला सतत तुझ्या चरणावर नतमस्तक होऊन दे.

महासरस्वती रूपात व महालक्ष्मी रूपात भक्तांवर अपार प्रेम करणारी ही हरि प्रिया असुर वृत्तीला आपल्या पायाखाली खेचते. तेव्हा ती महाकालीचे रूप धारण करते. म्हणून सतत सन्मार्गाच्याच रस्त्यावर चालले पाहिजे.

शारदीय नवरात्रौत्सव देवीची आपल्या रोजच्या जगण्याशी संबंधीत तत्वे लक्षात ठेऊन जर तुम्ही देवीची आराधना केली तर ती तुम्हाला व मला जगण्याची उमेद देईल बळ, ताकद देईल.

रोज नवीन रंगाच्या साड्या नेसलेल्या पाहिजेत, नवनवीन शृंगार केला तर देवी प्रसन्न होते हा समज मनातून काढून टाका.

हे लक्ष्य माते तुला वंदन
तावच्छीलं विराज ते ।
तावत्गुणां नराणां च
यावल्लक्ष्मी:प्रसिदति ।

माते तुझ्या शब्दरूपी पूजनात  काही चूका झाल्यास मला क्षमा कर ; उदे गं अंबे उदे

# सौ. शुभदा देशमुख यांनी रांगोळीतून देवी महाकालीची सुंदर चित्रकृती केली आहे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर-** छ. संभाजीनगर येथील कासलीवाल तारांगण हौसिंग सोसायटी येथील राहिवासी सौ. शुभदा पराग देशमुख या प्रत्येक सणाला भव्य रांगोळीद्वारे सर्वांना आकर्षित करतात.

दरवर्षी प्रत्येक जयंती पुण्यातिथी, गणेशउत्सव, नवदुर्गा या वेळी त्या हमखास भाविकांसाठी रांगोळीची कलाकृती भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी असते.




ही कलाकृती बनविण्यासाठी त्यांना ७-८ दिवसाचा कालावधी व २० ते २५ किलो रांगोळी लागते. ही कलाकृती पाहून भाविक व राहिवासी खूप आनंदी होतात.  कलाकार ताईंना ही कलाकृती पाहून आत्मिक आनंदाबरोबर बोलक्या चेहऱ्यासोबत त्या नेहमी प्रसन्न व बोलक्या असतात.या कार्यात त्यांचे पतीराज व मुलींचा सक्रिय सहभाग असतो.

# शारदीय नवरात्री उत्सवातील माझी पाहीली माळ  अनाथाची नाथ असलेल्या दाईला

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

कितीतरी तान्ही बाळ कचऱ्याच्या डब्यात, आश्रमाच्या दारात, हॉस्पिटल मधे ठेवून पळून गेलेल्या बातम्या आपण ऐकत असतो. मग या तान्ह्या जिवांच काय होतं !!. ती कुठे आणि कश्या अवस्थेत जगतात!!, मोठी होतात!! तर एकच उत्तर की ती आश्रमात  मोठी होतात. खूपश्या लहान लहान बाळांना तिंथं एकत्र ठेवलं जातं. त्या अनाथ मुलांची काळजी घेणारी एक महिला कर्मचारी असते. मुलांचे संगोपन, दूध पाजणे, शी शू साफ करणे, त्यांना भावनिक आधार देणे, त्यांच्या बाल गरजा पूर्ण करणे, त्यांचे आरोग्य सांभाळणे. यासाठी ही कर्मचारी दाई नियुक्त केलेली असते. ती जबाबदारीने बाळांचे सर्व काम प्रेमाने करत असते.

आपल्या घरात पाहायला गेलंच तर एक बाळ एक आई अस गणित असतं; पण आश्रमात मात्र एकाच वयाच्या कितीतरी बाळाच्या संगोपनासाठी एकच दाई किंवा दोन दाई असतात. ती त्यांची आई असते. आपल्या पोटच्या पोराला सारेच प्रेमाने करतात हो,  दुसऱ्याच्या !! तेही अगणित !! खूप कठिण असतं ते. थोडक्यात, अनाथ आश्रमातील दाई मुलांचे संगोपन करणारी आणि त्यांना एक सुरक्षित घर देणारी एक महत्त्वाची व्यक्ती असते.

अश्या या मातांना माझी आजची माळ...

श्रीमती कल्पना दिलीप मापूसकर
मीरा रोड. मुंबई ९०८२६ ४६४९४

# घटस्थापना - एक आत्मसंवाद

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सध्या सगळ्या सणांचे स्वरूप बघितले तर त्यात दिखावा किती आणि भक्ती किती? हे ठरवता येत नाही.   असे सण बघून खूप अंतर्मुख व्हायला होते. आणि सणांचे नक्की उद्देश काय आहेत असा विचार सुरु होतो. असे वाटते *घटस्थापना* यातील घटक हरवत चालले आहेत. आणि वरवरचे देखावे, चकचकाट, कपडे दागिने यात मूळ संस्कृती लुप्त होत आहे. मला तर वाटते, घटस्थापना म्हणजे आपल्यातील गुणांची स्थापना! नवीन सृजनाचा आविष्कार !

या नऊरात्रीत आपण ''आत्मसंवाद'' करुन आपल्यात चांगल्या गुणांची स्थापना करावी. जसे धान्य पेरतो तसे चांगल्या विचारांचे, योग्य संस्काराचे बीज पेरावे. आणि जसे धान्य उगवते तसे हे विचाररूपी बीज पण रुजून त्यांचे ताजे व चिरकाल टवटवीत राहणारे सदाहरीत पीक यावे. नवनिर्माण व्हावे.

जशी देवी दुष्ट शक्तींचा नाश करायला अवतरते तसेच आपल्या मनातून दुष्ट, वाईट विचारांचा नाश चांगल्या विचारांनी करावा. दुर्गा ही कठीणतेवर मात करणारी देवी! तसेच आपणाही आपल्या समस्या, संकटे यावर आपल्या विचारांनी मात करावी. आपल्या मनात देवीच्या शक्तीचे जागरण करावे. या शक्ती म्हणजे आपल्यातील चांगले विचार !

ताणावर धैर्याने मात करावी.

संकटकाळी व कठीण प्रसंगी धीर धरावा.

भीतीच्या वेळी शौर्य बाळगावे.

दिनदुबळे, गरीब, पशुपक्षी यांच्या बद्दल करुणा असावी.

वाईट विचारांवर सात्विकतेने मात करावी.

अनितिला नितिमूल्यांनी उत्तर द्यावे.

दुर्बलता असते तिथे आत्मबल वाढवावे.

अडचणीवर सन्मार्गाने मात करावी.

असत्यावर सत्य अवलंबावे.

घट म्हणजे आपले मूळ. त्याची सद्‌गुणात्मक मातीत रुजवणूक करावी. त्यावर सदाचाराचे अमृत शिंपावे.

घटाची स्थापना करणे म्हणजे आपल्या शरीररूपी घटात सात्विकता, सद्गुण टिकवून ठेवणे. आणि या घटरुपी शरीरात नऊ गुणांची स्थापना करु या. आणि या गुणांचा कायम जागर करुन त्यांना जागृत ठेवू या. या सगळ्या शक्ती एका घटात एकत्रित करुन आपली आत्मशक्ती वाढवू या. आणि काळानुरूप बदलणाऱ्या वाईट प्रथा, दुष्ट प्रवृत्ती, घातक साधने, घातक रूढी यांच्यावर मात करु या. रामदासस्वामी म्हणतात, ''मिळमिळीत अवघे टाकून द्यावे'' याचा अर्थ हाच आहे, या दिवसात जुन्या, शिळ्या, वाईट गोष्टी टाकून द्याव्यात. आणि उत्तम, उदात्त गुणांची  आपल्या अंतरंगात स्थापना करावी. व तेजची उपासना करावी.

**विभावरी कुलकर्णी**
**८०८७८१०१९७**



दुर्गा म्हणजे सर्वांच्या एकत्रित सद्‌गुणांची प्रेरणा आहे. आज समाजात, घरात, अवती भोवती जे दुर्गुण, वाईट विचार, वाईट कृत्ये यांच्या रूपाने जे असूर वावरत आहेत त्यांच्यावर मात करण्यासाठी आपल्यातील सगळ्यांच्या सद्गुण रुपी शक्तींनी एकत्र येण्याची गरज आहे. तरच ही देवी फक्त घटात न राहता आपल्या आचरणात येईल. आणि खऱ्या अर्थाने घटस्थापना होईल.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559